# Research Papers Published in UGC Care List Journals

| | |
|---|---|
| Name of Faculty | Dr. Suresh Vasant Shikhare |
| Name of Department | History |
| Academic Year | 2023-2024 |

| Sr. No. | Name of Research Papers | Name of the UGC Care list Journal and Publication | Page No |
|---|---|---|---|
| 01 | समकालीन इतिहासलेखन प्रवाह: एक परिचयात्मक टिपणी | Sanshodhak<br>Year 91, Vol. 04<br>ISSN 2394-5990<br>V. S. Rajawade Sanshodhan Mandal, Dhule, Maharashtra | Page No. 213 to 217 |
| 02 | गांधीवादी आदिवासी नेत्या राजमोहिनी देवी | Sanshodhak<br>Year 92, Vol. 08<br>2394-5990<br>(UGC Care Listed<br>V. S. Rajawade Sanshodhan Mandal, Dhule, Maharashtra | Page 180-182 |

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

## इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक ४ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- **शके १९४५**
- **वर्ष : ९१**
- **पुरवणी अंक : ४**

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. आर. एस. मोरे
- प्रो. डॉ. ए. के. वावरे
- डॉ. ए. व्ही. पोरे

**✷ प्रकाशक ✷**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०

Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

४१. **साधू संतांची कामगिरी आणि मध्ययुगीन भारतीय मार्क्सवादी इतिहासलेखन**

– प्रा. मनोहर निकम ---------------------------------------------------------------------१८७

४२. **आष्टा शहराचा स्थानिक इतिहास**

– प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश ------------------------------------------------ १९१

४३. **कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यावरील चरित्रग्रंथ– एक अभ्यास**

– डॉ. राजेंद्र मोरे --------------------------------------------------------------------------१९६

४४. **प्रादेशिक इतिहास प्रवाह – एक चिकित्सक अभ्यास**

– डॉ. राजेंद्र नामदेव रासकर ---------------------------------------------------------- २००

४५. **'जिणं आमुचं': वंचितांच्या इतिहासाचे साधन'**

– डॉ. श्रीमती स्वाती रामराव सरोदे ---------------------------------------------------२०४

४६. **डॉ. आंबेडकर यांच्या अस्पृश्यता निर्मीतीच्या सिध्दांताची मीमांसा**

– प्रा. डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत ---------------------------------------------------- २०९

४७. **समकालीन इतिहासलेखन प्रवाह: एक परिचयात्मक टिपणी**

– डॉ. सुरेश वसंत शिखरे ---------------------------------------------------------------- २१३

४८. **अस्पृश्य वतनदार जातींचे गाव–गाड्यातील स्थान : एक अभ्यास**

– प्रा.डॉ.नारायण सुर्यवंशी ------------------------------------------------------------------२१८

४९. **लोकसंस्कृतीच्या जडणघडणीत लोकसंस्कृतीच्या उपासकांची भूमिका व सदयस्थिती**

– डॉ. अनिल शिवाजी टिके --------------------------------------------------------------- २२२

५०. **अहमदनगर जिल्ह्यातील विडी कामगार संघटनेच्या उभारणीत कम्युनिस्ट पक्षाचे योगदान**

– प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर ------------------------------------------------------------ २२६

५१. **सातारच्या शाहू महाराजांचे एक सरदार म्हणून बाळाजी विश्वनाथ यांचे कार्य**

– प्रा. निलेश प्रकाश जमदाडे --------------------------------------------------------------२३१

५२. **मराठा इतिहास लेखनशास्त्रातील ग्रँट डफच्या इतिहास लेखनासंबंधीचा वादविवाद**

– चंद्रशेखर काशिनाथ काटे ------------------------------------------------------------------२३४

५३. **२१ व्या शतकात भारतातील नवीन राज्यांच्या निर्मितीचे बदलणारे निकष विशेष संदर्भ तेलंगणा राज्य**

– Shubham Balasaheb Kathale ----------------------------------------------- २३८

# समकालीन इतिहासलेखन प्रवाह: एक परिचयात्मक टिपणी

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
इतिहास विभाग प्रमुख,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर.
Affiliated to Shivaji University, Kolhapur.
मो. नं. ९८५०४८९५२३

**प्रस्तावना:**

इतिहास म्हणजे काय हा प्रश्न जेव्हा येतो तेव्हा भूतकालीन राजकारण, थोरामोठय़ांची चरित्रे, वर्गसंघर्ष, इतिहास म्हणजे अन्वयार्थ, चिकित्सा अशा अनेक धारणा आपल्या समोर येतात. कालक्रमात इतिहास ही धारणा आणि संकल्पना किती बदलली आहे याची साक्ष देणारी अनेक उदाहरणे देता येतील. इतिहास म्हणजे, राजा, लढाया, स्वातंत्र्य-आंदोलनाचे वृत्तांत इथपर्यंतच मर्यादित राहिलेला नाही तर मानवी समाजाची सर्वांगीण कहाणी बनू पाहत आहे. या लेखाच्या माध्यमातून आधुनिक कालखंडात इतिहासलेखन शास्त्रात जे नवीन लेखन अथवा विचार प्रवाह आले त्यामध्ये समकालीन इतिहासलेखन प्रवाहाची सैद्धांतिक चर्चा केलेली आहे.

**इतिहासलेखनातील बदलता प्रवाह :**

‘इतिहास’ शब्दाचे प्रयोजन दोन अर्थांनी केले जाते. इतिहास म्हणजे घडून गेलेला भूतकाल आणि भूतकालाविषयीचे लेखन. इतिहासलेखन या दोन गोष्टींना सांधण्याचे काम करते. इतिहास हे एक शास्त्र आहे. इतिहास कसा लिहिला जातो? या विद्याशाखेची म्हणून एक संशोधनपद्धती आहे. इतिहासलेखनाची परंपरा जगभरात प्राचीन काळापासून होती. मात्र मानव्यविद्येतील एक विद्याशाखा म्हणून इतिहासाची उत्क्रांती पाश्चिमात्य देशांत प्रबोधनकालापासून (Renaissance) घडून आली. इतिहास म्हणजे भूतकालाविषयीचे ज्ञान. हे शास्त्रीय पद्धतीने कसे निर्माण करायचे ? इतिहासाचे लेखन ऐतिहासिक साधनांशिवाय करणे अशक्य आहे.[१]

इतिहासलेखनशास्त्रमध्ये साधनांना अथवा पुराव्याला कच्चा माल (Raw Material) म्हटले जाते. ज्या काळाचा शोध घ्यायचा, त्या काळात निर्माण झालेली साधने ही इतिहासलेखनाची प्राथमिक साधने असतात. ङ्गइतिहास म्हणजे गतकालीन राजकारणफ ही इतिहासविषयक संकल्पना प्रभावी बनली. ङ्गदस्तऐवजांमध्ये जे नसते, ते अस्तित्वात नसते,फ असे रांकेने जाहीर केले. रांकेची ही धारणा युरोपीय इतिहासकारांच्या तीन पिढ्यांनी प्रमाण मनाली. भारतामध्ये इतिहासलेखनाची ही शास्त्रशुद्ध परंपरा वासाहतिक काळापासून सुरू झाली, याकाळातील भारतातील इतिहासलेखनावर तब्बल दीडशे वर्षे रांकेच्या इतिहासलेखण परंपरेचा प्रभाव होता.[२] इतिहास म्हणजे राजकीय संघर्ष ही धारणा युरोपीय आणि भारतातील इतिहासलेखनाचे समान सूत्र असलेले दिसते.

वैज्ञानिक क्रांतीनंतर नैसर्गिक शास्त्रांप्रमाणेच इतिहासासारख्या मानव्यविद्यांतील संशोधनासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केला पाहिजे अशा विचार मूळ धरू लागला. शास्त्रीय संशोधनपद्धतीत अनुभवजन्य पुरावा, प्रयोग, अनुमान, निगमन व विगामी तर्कपद्धत (Deductive and Inductive Method) या गोष्टींना महत्त्व आहे. विवेकनिष्ठा (Reason) व प्रत्यक्षप्रमाणवाद (Empiricism) हे शास्त्रीय संशोधनासाठी अत्यावश्यक घटक बनले. मानवी स्वभाव हा वैश्विक असतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला होणारे आकलन सारखेच असते आणि म्हणून ज्ञान हे वैश्विक असते. ऑगस्त कॉम्त (१७९८-१८५७) याच्या प्रत्यक्षार्थवादाने (Positivism) ऐतिहासिक घटितांच्या अभ्यासातून मानवी समाजाविषयीचे नियम/सिध्दांत (laws) मांडता येतात, अशी मांडणी केली.[३]

१८ व्या शतकापासून रांके प्रणीत इतिहासलेखन पद्धतीची आणि ऑगस्त कॉम्तच्या प्रत्यक्षार्थवादाची चिकित्सा सुरू झाली. मात्र हेन्री बेर, (१८६३-१९५४) ल्युसिन फेबव्र (१८७८-१९५६) व मार्क ब्लॉक (१८८६-१९४४) यांनी इतिहास म्हणजे राजकीय घडामोडी आणि वर्णनात्मक इतिहास या संकल्पनांना अतिशय प्रभावीपणे आणि पद्धतशीरपणे विरोध केला. घटिते म्हणजे समाजातील घडामोडींचा केवळ दृश्य भाग असतो. एनाल्स परंपरेचा इतिहासलेखनावर खोल प्रभाव पडला. यातूनच स्थानिक इतिहास, पर्यावरणाचा इतिहास, खाद्यसंस्कृतीचा इतिहास हे नवे प्रवाह विकसित झाले. केवळ समग्रलक्ष्यी इतिहास महत्त्वाचा नसून अंशलक्ष्यी इतिहास अथवा विशेष अभ्यास (Case Studies) हेही तेवढेच महत्त्वपूर्ण आहेत, या भूमिकेतून नवनवे संशोधन पुढे आले.[४]

**समकालीन इतिहासाची संकल्पना :**

'समकालीन' ही संकल्पना अथवा संज्ञा इंग्रजीमधील 'Contemporary' या शब्दाला मराठीत पर्यायवाची शब्द आहे. 'समकालीन' हा शब्द साहित्य क्षेत्रात मोठ्या खुबीने वापरला जातो. साहित्यिक, नाटककार, कवि, समीक्षक व टीकाकार या शब्दाचा वापर वारंवार करतात. आपण या ठिकाणी 'समकालीन' चा संबंध इतिहास लेखनाच्या दृष्टीकोनातून पाहणार आहोत. 'अलीकडील भूतकाळाचा' (Recent Past) यासाठी 'समकालीन इतिहास' ही संकल्पना अथवा संज्ञा वापरली जाते. 'समकालीन' या संज्ञेची जाणीव (साहित्य/ इतिहास) मुळात भारतीय नाही. सामाजिक व राजकीय तत्त्वज्ञानाच्या संदर्भात युरोपीय देशात २० व्या शतकात या संज्ञेचा वापर झाला.

'Contemporary' हा शब्द लॅटिनमधील 'Contem Porarious' पासून तयार झालेला आहे. 'लेप' म्हणजे एकत्र व 'Tempus', 'Tempur' म्हणजे काळ. यामधील 'Tempus' हा लॅटिन 'Tempur' हा इंग्रजी शब्द मात्र दोन्हीचा अर्थ वेळ, काळ या अर्थाने आहे. म्हणून 'Contemporary' म्हणजे एका काळात राहणारे अथवा 'ज्या काळात आहात त्या काळाशी सुसंगत असणे' म्हणजे आपण ज्या काळात राहतो, वावरतो, त्या काळातील घडलेल्या घटनांचा इतिहास.[५] काही इतिहासकार व संशोधक समकालीन इतिहासाला ऐतिहासिक अभ्यास करण्यासाठीचा विषय निवडण्याची पध्दती मानतात.

काही इतिहास संशोधक आधुनिक इतिहासाचा एक उपघटक म्हणून या ज्ञानशाखेच्या संकल्पनेकडे पाहतात, तरीही काही इतिहास संशोधकांनी 'समकालीन इतिहासाला परिभाषित करण्याच्या प्रयत्न केलेला दिसतो. जर्मन इतिहासकार हरमन हीमपेल ह्यांनी इ.स. १९५७ मध्ये समकालीन इतिहासाची व्याख्या ''सर्वात शेवटच्या किंवा सर्वात अलीकडील उलथापालथीच्या घटनेपासून सुरू होणारा काळ अशी केली होती. (Any Present time begins with the last catastrophe, the most recent one) समकालीन इतिहासाची हरमन हीमपेल यांची व्याख्या आपण मानली तर समकालीन इतिहासाचा कालखंड हा प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक इतिहासाच्या कालखंडाप्रमाणे न बदलणारा नसून तो सातत्याने बदलणारा बनतो.''[६]

गिओफ्री बाराक्लोव यांनी इ. स. १९६४ मध्ये 'ॲन इंट्रॉडक्शन टू कंटेम्परारी हिस्ट्री' हा ग्रंथ प्रसिध्द केला. यामध्ये 'समकालीन इतिहास' यासंबंधी बाराक्लोव यांनी अशी भूमिका मांडलेली आहे की, 'समकालीन इतिहास' हा आधुनिक इतिहासापेक्षा 'गुणवत्ता व आशया'मध्ये (Quality and Content) वेगळा असतो. या दृष्टीकोणातून समकालीन इतिहासाची व्याख्या करताना बाराक्लोव म्हणतात की, ''आजच्या जगात आस्थित्वात असलेले प्रश्न जेव्हा सदृश्य आकार घ्यायला लागतात, तेव्हापासून समकालीन इतिहास सुरू होतो.''[७] (Contemporary History begins when the problems which are actual in the world today first take visible shape.)[८]

समकालीन इतिहास लेखनाचा मुख्य उद्देश अलीकडील भूतकाळातील काही पैलू अथवा वर्तमान काळातील काही घटना, विकासाच्या संकल्पना, संदर्भ आणि त्याची ऐतिहासिकता समजून घेणे असा असला तरी 'हिस्ट्री' हा शब्द ज्या 'हिस्टॉरिया' या ग्रीक भाषेतील शब्दावरून आला आहे. त्याचा मूळचा अर्थ 'समकालीन घडामोडीचे ज्ञान' असा होतो. थ्युसीडीडीजने (इ. स. पू. ४००-४५५) पेलोपॉनेशियन आणि अथेनियन लोकांच्यामधील युध्दाचे कथन व लेखन केलेले आहे. थ्युसीडीडीज स्वतः या युध्दात सहभागी होता.

**१९ व्या शतकातील इतिहासलेखन विषयक दृष्टीकोण :**

१९ व्या शतकापर्यंत लिहीले गेलेले सर्व इतिहास अलीकडील भूतकाळाचा इतिहास अर्थात समकालीन इतिहास सांगणारे होते. याचे प्रमुख कारण म्हणजे या काळात दूरवरच्या भूतकाळाचा शास्त्रशुध्द पध्दतीने अभ्यास करण्यासाठी लागणारे संशोधन तंत्र व साधने तपासण्याची पध्दती विकसित झालेली नव्हती. छापखाने अस्तित्वात येण्याच्या अगोदर कागदपत्रे सहजासहजी मिळवणे शक्य नव्हते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपियन इतिहासकारांध्ये असा विचार प्रबळ झाला की, एखादी घटना घडून गेल्यानंतर, एखादी पिढी संपल्यानंतरच त्या घटनेचा वस्तुनिष्ठपणे इतिहास लिहीला जावू शकतो. वस्तुनिष्ठ इतिहास म्हणजे, वर्तान काळातील वाद अथवा प्रश्नांचा कोणताही संदर्भ न घेता, 'जे काही घडले ते लिहिणे' (to write history as it actually happened) इतीहासकाराचे काम भूतकाळाचे मापन करणे नाही अथवा वर्तान काळातील लोकांना भविष्यकाळाच्या फायद्यासाठी कोणतीही शिकवण द्यायची नाही तरी फक्त 'जे घडले ते सांगणे'[९] हे आहे असा युक्तीवाद या काळात रान्केने केला.

**२० व्या शतकातील इतिहासलेखनविषयक बदल :**

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात अनेक तत्त्वज्ञ विचारवंतांनी इतिहास संशोधनाच्या पध्दती व वैज्ञानिक संशोधनाच्या पध्दतींची तुलना सुरू केली. इतिहास लेखन पूर्णपणे वस्तुनिष्ठ होवू शकते

ISSN No. 2394-5990

का हा ह्या विचारवंतांच्यामधील वादाचा अथवा तुलनेचा विषय होता. इतिहास लेखनाच्या पूर्ण वस्तुनिष्ठतेवर प्रश्नचिन्ह उभे केले गेले. पहिले व दुसरे महायुद्ध यासारख्या मोठ्या घटना युरोपच्या धर्तीवर घडल्या, या घटनाचे विश्लेषण करण्यासाठी, त्याची कारणमिमांसा, चिकीत्सा करण्यासाठी 'अलीकडच्या भूतकाळाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त झाले. विशेषत: दुसऱ्या महायुध्दामुळे जागतिक इतिहासाचे एक नवीन पर्व सुरू झाले असा समज अनेक संशोधक, अभ्यासकांचा झाला होता.

१९८० च्या दशकात एक विशिष्ठ ज्ञानशाखा म्हणून समकालीन इतिहासाचा विकास झालेला होता. याकाळात सामाजिक परिवर्तनाचा वेग आणि स्थित्यंतरांचा अभ्यास करणे इतिहासकारांना गरजेचे वाटत होते. अलिकडील भूतकाळ राजकीय आणि सार्वजनिक जीवनामध्ये वाद निर्माण करत होता. विशेषत: दुसर्या महायुध्दानंतर कल्याकारी राज्य स्थापन करण्याच्या संबंधात राजकीय पक्षाची भूमिका व अभिजनवादी वर्गाची भूमिका यासारखे वादाचे मुद्दे होते. यासाठी ऐतिहासिक व आंतरशाखीय पध्दतीशास्त्राचा वापर करून या विवादाचा अलीकडील भूतकाळाचा विश्लेषणात्मक पातळीवर अभ्यास करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले, यातून इ. स. १८८६ मध्ये समकालीन ब्रिटीश इतिहास संस्थेची स्थापना झाली. (Center for Contemporary British History) त्यानंतर हे केंद्र समकालीन इतिहासकारांचे आकर्षण ठरले.[१०] युरोपीय इतिहासकारांनी २० व्या शतकाच्या उत्तरार्धात मोठ्या प्रमाणात समकालीन इतिहास लिहीण्यास सुरुवात केली.

इ. स. १९३० च्या दशकात नेदरलँडमध्ये समकालीन इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी एका संस्थेची स्थापना झाली. त्यानंतर इ. स. १९३९ मध्ये ही संस्था लंडन मध्ये आणली गेली. पारंपारिक समाजापासून अलिप्त असलेल्या अभ्यासपूर्ण 'वस्तुनिष्ठ' इतिहासाने जर्मनीतील लोकांना 'जीवन जगण्यासाठी योग्य दिशा दाखवण्यात अपयश आले होते' आणि म्हणूनच जमर्नीमधील लोकांनी हिटलरच्या हुकूमशाहीला पाठिंबा दिला होता अशी भावना जमर्न इतिहासकरांच्यामध्ये उदयास आली होती. ह्या भावनेच्या प्रभावाखाली जमनीतील इतिहासकारांनी 'समकालीन इतिहास' लिहीण्याच्या प्रकाराला मान्यता दिली.[११]

**विश्वसनीय साधनांची संकल्पना व समकालीन इतिहासलेखन प्रवाह :**

इतिहास लेखन पध्दतीमध्ये शासकीय कागदपत्रे व पुराभिलेखागारातील लिखित साधनांना लिओपोल्ड रान्के व इतर आधुनिक विज्ञानवादी विचारवंतांनी खूप महत्त्व दिले होते. 'विश्वसनीय साधनांची' (Reliable Sources) इत्यादीची त्यांची एक संकल्पना होती, ज्यामध्ये त्यांच्या वैज्ञानिक इतिहासलेखनाच्या दृष्टीकोणातून 'पुराभिलेख गटातील लिखित साधनांना' अनन्यसाधारण महत्त्व होते. लिखित साधनाशिवाय इतिहास लिहीता येत नाही (No document No History) ह्या रान्केवादावर इतिहासकारांचा विश्वास होता.

कारण दैनंदिन व्यवहाराच्या नोंदी ठेवण्याची आवश्यकता समाजाला वाटत नाही, तर या गोष्टी पुराभिलेखागारामध्ये सापडत नाहीत. जनसामान्याच्या दैनंदिन व्यवहाराबाबतीत पुराभिलेखागार मौन बाळगतो, त्यामुळे घडून आलेला बदल, सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थित्यंतर त्याला दिलेला प्रतिसाद किंवा केलेला प्रतिकार जाणून घेण्यासाठी इतर साधनांच्याकडे पहावे लागते.

**अंतरिमकाळाची संकल्पना व समकालीन इतिहास :**

वस्तुनिष्ठ इतिहासलेखन करण्यासाठी घडणार्या घटना आणि इतिहासलेखनाचा काळ यांच्यामध्ये विशिष्ठ अंतर असणे गरजेचे असते अशी कल्पना आपल्यामध्ये रूढ झालेली आहे. ह्याच अंतराच्या कल्पनेमुळे इतिहास आणि वर्तमान काळामध्ये एक ङ्गअंतरिक काळफम्हणजे साधारण ३० वर्षाचा असला पाहीजे असा समज आहे. अनेक देशांच्यामध्ये सरकारी कागदपत्रे ३० वर्षांनी खुली करण्याची पध्दती आहे, त्यामुळे हा काळ गृहित धरला जातो, त्यामुळेच सरकारी कागदपत्रे, गोपनीय अभिलेख, अहवाल इत्यादी दस्तावेज अभ्यासल्याशिवाय एका परिपूर्ण इतिहासाची मांडणी करता येणार नाही असा अनेक इतिहासकारांचा समज आहे.

**पारंपारिक साधनांच्या पलीकडे एक नवीन दृष्टीकोण :**

इ. स. १९८०-९० च्या दशकापासून इतिहास लेखनाचे नवीन दृष्टीकोण अथवा प्रवाह आणि पध्दती निर्माण झालेल्या दिसतात. यालाच नूतन इतिहास (New History) असे संबोधले जाते. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक इतिहास, नागरी इतिहास, स्त्रीवादी इतिहास, लिंगभेद, पुरुषत्वाचा इतिहास, वंचित इतिहास, स्थानिक इतिहास, लिंगभेद आणि पुरुषत्वाचा इतिहास, अंशलक्षी इतिहास, समकालीन इतिहास इत्यादीचा समावेश होतो.

स्वातंत्र्योत्तर भारतात एकाच कळात नागरी क्रांती, औद्योगिक क्रांती, हरितक्रांती, धवलक्रांती, लोकशाही सशक्तीकरण, राजकीय स्थरीकरण आणि अभिसरण, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक बदल मोठ्या प्रमाणात झालेले आहेत. मात्र ह्या मूलभूत स्थित्यंतरांचा राष्ट्र, प्रदेश, जात, वर्ग, लिंग आणि आर्थिक दृष्टीकोणातून इतिहास व विश्लेषणात्मक दृष्टीकोणातून लिखाण

करणे हे महत्त्वाचे आहे. कोणत्याही इतिहासकाराने समकालीन भारतातील निवडणूका अथवा बदलत्या निवडणूक प्रक्रीयेचा अथवा लोकशाही स्थित्यंतरांचा इतिहास लिहीलेला आढळत नाही, त्यासाठी समकालीन इतिहास लेखन गरजेचे आहे.

**समकालीन इतिहास लेखनातील समस्या :**

समकालीन विषयाच्या संदर्भात कागदपत्राची कमतरता नाही, मात्र ती एका छताखाली अथवा पुस्तक, ग्रंथस्वरूपात उपलब्ध होत नाहीत. विशालकाय माहिती जमा करणे हे खरे आव्हान आहे.एका बाजूस समकालीन इतिहासाची साधने जमा करणे हे इतिहास संशोधकाला जसे आव्हान आहे तसेच आव्हान समकालीन घटनांच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या संदर्भ साधनांच्या विपुलतेचे एकीकडे आव्हान आहे.

समकालीन इतिहास संशोधकाला पारंपारिक साधनांच्याबरोबर अपारंपारिक संदर्भ साधनाचा मोठ्या प्रमाणावर आपल्या लेखनासाठी वापर करावा लागतो. विशेषत: मौखिक इतिहास, कारण समकालीन इतिहासल लेखकाला फक्त लिखित पुराव्यावर भिस्त ठेवून चालत नाही, त्यासाठी मौखिक हा पर्याय राहतो. ज्या घटनांच्या, व्यक्तीच्या, समूहाचा इतिहास लिखित स्वरूपात मागे राहिलेला नाही किंवा जे घटक समूह शांतच राहिले. त्यांच्या इतिहासाची पुर्नप्राप्ती करण्याचे मौखिक साधन हे उत्तम आहे मात्र मौखिक इतिहासाच्या मर्यादा व धोके लक्षात घेऊन त्याचा सावध उपयोग करणे गरजेचे ठरते. मौखिक इतिहासाचा वापर समकालीन इतिहासकाराने खुबीने आणि आंतरविद्याशाखीय दुवा वापरून करणे गरजेचे आहे.

समकालीन इतिहासलेखनामधील सर्वात महत्त्वाची अडचण म्हणजे त्यांनी लिहीलेल्या इतिहासाचा वाचक हा टीकात्मक भूमिकेतून वाचन करणारा असतो. या संदर्भात य. दि. फडके म्हणतात की, ''इतिहासकाराच्या दृष्टीने सर्व माणसे कालवश झालेली असतात! समकालीन इतिहास लिहिण्याने हयात असलेल्या व्यक्तींना तसेच दिवंगत व्यक्तींना सारखीच वागणूक देण्याची तयारी ठेवली पाहिजे. हयात असलेल्या तसेच दिवंगत झालेल्या व्यक्तीविषयी हातचे राखून न ठेवता समकालीन इतिहासकाराने मोकळेपणाने खरे बोलले पाहिजे. तशी त्याच्या मनाची तयारी नसेल तर समकालीन इतिहास लिहिण्याच्या न पडता त्याने इतिहासपूर्व काळातील विषय संशोधनासाठी व लेखनासाठी निवडावा.''[११]

समकालीन इतिहास हा शब्द ते पिढीच्या इतिहासाचा आहे असे म्हणतात, ते म्हणतात. ''The phrase contemporary history is the history of generation for simple reason that generations overlap.''[१२]

**समकालीन इतिहासाचे फायदे :**

समकालीन इतिहास लेखनात अनेक अडचणी, आव्हाने व समस्या असल्या तरी एक मोठा फायदा असतो, इतर कालखंडाच्या इतिहासकारांना मिळत नाही. कारण ते त्या समकालीन घटनाचे प्रत्यक्ष साक्षीदार अथवा त्या कालखंडाच्या समकालीन असतात. त्यामुळे या कालखंडावर लिखाण केल्याचे अनेक  फायदे आहेत, ते खालीलप्रमाणे :

समकालीन इतिहास लेखकाला अलीकडील भूतकाळातील व वर्तमान लोकांच्या भावना समजून घेण्याची संधी असते. दूरवरच्या भूतकाळाचा इतिहास लिहिणार्या अभ्यासकाला ही संधी प्राप्त होत नाही. आपण ज्या काळावर, त्या काळातील घटना, विकास, स्थित्यंतरे, चळवळी व विविध सामाजिक-सांस्कृतिक घटकांच्यावर अभ्यास करत असतो, त्यामागील लोकांच्या भावनिकतेचा वेध घेण्याची क्षमता आणि संधी समकालीन इतिहासलेखकाला मिळते. कारण इतिहास लेखक म्हणून पुराण्यांच्या आधारे जरी त्या काळाचा इतिहास लिहिलेला असला तरी तो त्या काळातील लोकांच्या भावना व मनोभूमिका समजावून होवू शकत नाही. समकालीन इतिहासलेखक आपण जगलेल्या काळाचा इतिहास लिहीत असल्यामुळे त्याला मात्र हे शक्य होते.

**संदर्भ ग्रंथ:**

१. वांबूरकर, जास्वंदी., (संपा.) इतिहासातील नवे प्रवाह, डायमंड प्रकाशन, २०१४, प्रस्तावना, पृ. क्र. सहा (प्रस्तावना), व http://prahaar.in इतिहास स्थानिक ते वैश्विक.

२. कित्ता, पृ. क्र. सहा-सात.

३. कित्ता, पृ. क्र. सात.

४. कित्ता, पृ. क्र. आठ.

५. Dictionary.com,http://dictionary.reference.com

६. रुसो, हेनरी., द लेटेस्ट कॅट्यास्ट्रोफी; हिस्टरी, द प्रेझेंट, द कांटेम्परारी, यूनिवर्सिटी ऑफ शिकागो प्रेस, २०१६.

७. शिवदे, सदाशिव, (संपा) संशोधन पत्रिका २०१६, अवनीश पाटील, समकालीन इतिहास, २०१७ पृ. २२१, Barraclough, G. 1966. An Introduction to Contemporary History. London: C.A. Was Co. P. 12.

८. कित्ता. पृष्ठ १७

ISSN No. 2394-5990

९. कित्ता. पृष्ठ १९

१०. Michael D. Kandiah, Making History (the changing face of the profession in Britain, Contemporary history), p. 1

११. कित्ता. पृष्ठ २३

१२. शिवदे, सदाशिव, (संपा) संशोधन पत्रिका २०१६, अवनीश पाटील, समकालीन इतिहास, २०१७ पृ. २२६

■■■

UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
# या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

**पुरवणी अंक ८ – मार्च २०२४ (त्रैमासिक)**

- **शके १९४५**
- **वर्ष : ९२**
- **पुरवणी अंक : ८**

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्राचार्य डॉ. अनिल माणिक बैसाणे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे
- डॉ. एस. व्ही. पणदे
- डॉ. एम. बी. मगदूम

**✷ प्रकाशक ✷**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४२२२८९४७१, ९४०४५७७०२०
Email ID : rajwademandaldhule1@gmail.com
rajwademandaldhule2@gmail.com

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

अंक मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी (फक्त अंक) रु. ५००/-, लेख सदस्यता वर्गणी : रु. २५००/-

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, पुणे.

टीप : या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

३५. **'उगवाई' नियतकालीकातील कथांमध्ये आलेला स्त्रियांचा संघर्ष**
– प्रा. मच्छगंधाली नितीन तारळेकर ---------------------------------------------- १५९

३६. **महाराष्ट्रातील शेतकरी, कामगरांचे जागतिक प्रगतीत योगदान**
– प्रा. सचिन पोपट सवने ----------------------------------------------------- १६३

३७. **कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षणविषयक विविध योजना**
– प्रा.डॉ.संजीव सुखलाल बोडखे ------------------------------------------------ १६८

३८. **पंडिता रमाबाईंच्या जडणघडणीतील अनंतशास्त्री डोंगरे यांचे योगदान**
– प्रा. डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले ------------------------------------------------ १७२

३९. **पेशवेकालीन विवाहविषयक कागदपत्रे – सबाल्टर्न (वंचित) इतिहासलेखनाचे महत्त्वाचे दस्तऐवज**
– डॉ. रामचंद्र वसंत कुंभार ----------------------------------------------------- १७६

४०. **गांधीवादी आदिवासी नेत्या राजमोहिनी देवी**
– डॉ. सुरेश वसंत शिखरे ----------------------------------------------------- १८०

४१. **प्रचितगडाचा इतिहास**
– १) डॉ. सोनावाले राजेंद्र रघुनाथ, २) प्रा. कुंभार भाग्यश्री शामराव -------------- १८३

४२. **किल्ले प्रतापगड : इतिहास व ऐतिहासिक वास्तू**
– प्रा. डॉ. विश्वनाथ पवार ----------------------------------------------------- १८६

४३. **वंचित इतिहासाच्या परिप्रेक्षातून दक्षिण महाराष्ट्रातील स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीत योगदान**
– १) डॉ. हाजी नदाफ २) डॉ.रणजीत माने ----------------------------------------- १९०

४४. **इतिहासलेखन प्रवाहातील योगदान सबाल्टर्न स्टडीजचे**
– प्रा. डॉ. बाळासाहेब नानासाहेब देवकाते ----------------------------------------- १९५

४५. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सायमन कमिशन**
– प्रा. डॉ. बाळासो निवृत्ती कर्पे ---------------------------------------------- १९९

४६. **स्वातंत्र्यसैनिक शिवलाल त्रिलोकचंद पोरवाल : अज्ञात भारतीय स्वातंत्र्यसैनिकाचा शोध**
– प्रा. डॉ. ओलेकर प्रमोदकुमार अंकुश ------------------------------------------ २०२

४७. **सबाल्टर्न इतिहास : अर्थ, स्वरूप व मर्यादा**
– डॉ. डी. ई. मनेरे -------------------------------------------------------- २०८

# गांधीवादी आदिवासी नेत्या राजमोहिनी देवी

**डॉ. सुरेश वसंत शिखरे**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर
Affiliated to Shivaji University, Kolhapur
shikharesuresh88@gmail.com
भ्रमणध्वनी-क्र.९८२३९७८९९५

**प्रस्तावना :**

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडात महात्मा गांधी यांच्या विचार-कार्याचा परिणाम अनेक लोकांच्यावरती पडलेला अगदी ठळकपणे दिसतो. यातून अनेक स्वातंत्र्य सैनिक आणि समाजसुधारक पुढे आले. काहींनी ब्रिटीशांच्या जोखंडातून भारतीय जनतेला मुक्त करण्याचा प्रयत्न केला तर काहींनी सामाजिक दास्यांच्या बेड्या तोडण्याचे कार्य केले. दोहोंचे समान ध्येय होते मानव मुक्तीचे. यामध्ये अशाच एका आदिवासी गांधीवादी नेत्या राजमोहिनी देवी यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. आदिवासी गौंड जमातीमध्ये जन्मलेल्या, कोणत्याही स्वरूपाची राजकीय, शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या राजमोहिनी देवी यांनी अतिशय बिकट परिस्थिवर मात केली. गांधी विचारावर श्रद्धा असलेल्या राजमोहिनी देवी यांनी आदिवासी समाजातील अनेक अनिष्ठ प्रथा, परंपरा, रूढी यांच्या मुळावर घाव घलण्याचे महत कार्य केले. या शोधनिबंधाच्या माध्यमातून राजमोहिनी देवी यांच्या कार्याचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

छत्तीसगडमधील गांधीवादी विचारधारा असलेल्या सामाजिक कार्यकर्त्या आणि आदिवासी समाज समाजसुधारक म्हणून राजमोहिनी देवी यांचे नाव परिचित आहे. राजमोहिनी देवी यांचा जन्म ७ जुलै १९१४ रोजी सुरगुजा जिल्ह्यातील प्रतापपूर जवळील शारदापूर येथे झाला. त्या गौंड आदिवासी जमातीचा एक भाग असलेल्या मांजी जमातीमधील होत्या. त्यांच्या वडिलांचे नाव वीरसाई हे गोंड आदिवासी शेतकरी होते आणि त्यांच्या आईचे नाव शीतला होते.१ राजमोहिनी यांचे कोणतेही औपचारिक शिक्षण झालेले नव्हते. राजमोहिनी देवी यांनी लहानपणापासूनच त्यांच्या आयुष्यात प्रतिकूल परिस्थितीचा सामना केला. तिचे लहान वयातच लग्न झाले होते आणि लग्नानंतर सहा महिन्यांनी प्रकृती खालावल्याने तिला पुन्हा आई-वडिलांकडे यावे लागले. पाच वर्षांच्या प्रदीर्घ उपचारानंतर तिचा नवरा तिला सोडून गेला. परिणामी त्यांचे दुसरे लग्न वयाच्या १५ व्या वर्षी वड्राफनगर येथील गोविंदपूर गावातील रणजित सिंग यांच्याशी झाले. लग्ननंतर त्या गोविंदपूर येथे वास्तव्यास आल्या. राजमोहिनी देवी यांचे वैवाहिक जीवन अतिशय हालाकीचे होते.[२]

त्यांची मुले एका मागून एक मृत्यू पावत गेली. राजमेहिनी देवी यांना हे दुःख सहन करावे लागले आणि त्यातच त्यांचा पती मद्यपी असल्याने त्यांच्या जीवनात एक बदल झाला जो त्यांच्या समाज कार्यासाठी उपयुक्त ठरला.गोविंपूर येथूनच त्यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरवात केली.[३]

राजमोहिनी देवी यांचा पोशाख अतिशय साधा होता. त्या हिरवी अथवा निळी कडा असलेली पांढर्या रंगाची सूती साडी नेसत असत. राजमोहिनी देवी अतिशय साधे जीवन जगत होत्या.

आयुष्यभर त्यांनी दूरदूरच्या खेड्यांमध्ये पायी प्रवास करून आपल्या आदिवासींना बांधवांना संघटित केले आणि त्यांना गांधीवादी विचार अंगीकारण्यासाठी प्रेरित केले. त्यांना अक्षरांचे ज्ञान नव्हते मात्र त्यांच्या व्यावहारिक ज्ञानाने त्यांना समाजनेत्याच्या उच्च पदावर बसवले. भारताला स्वातंत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या विचारधारेत मोठे परिवर्तन घडून आले. सन १९५१ मधील सुरगुजा येथील दुष्काळातआदिवासी लोकांचे झालेले हाल, आर्थिक प्रश्न, नशेचा प्रश्न, आदिवासी समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपराच्या विरोधात त्यांनी चळवळ सुरू केली. ती'राजमोहिनी चळवळ' म्हणून ओळखली जाते. राजमोहिनी देवी यांची ही चळवळ पूर्णतः गांधीवादी विचारधारेवर आधारित होती.

ISSN No. 2394-5990

**राजमोहिनी देवी यांच्या या चळवळीची पुढील मुख्य उद्दिष्टे होती.**[४]

१) सुरगुजा मधील जमातींमध्ये गांधी तत्वज्ञानाचा प्रचार-प्रसार करणे आणि त्यांना राष्ट्राच्या मुख्य प्रवाहाशी जोडणे.

२) सार्वजनिक सभांद्वारे लोकांच्यामध्ये अंधश्रद्धेविरुद्ध जागृती करणे.

३) आदिवासी समाजाला रूढीवादी आणि निरर्थक रूढींच्या बंधनातून मुक्त करणे.

४) स्वावलंबनाद्वारे त्यांना मानसिकदृष्ट्या निरोगी बनवणे.

५) स्वच्छता आणि सफाईवर विशेष भर.

६) शोषणाविरुद्ध आवाज उठवणे.

७) महिला प्रबोधनाच्या समर्थनार्थ आवाज उठवणे.

आदिवासी समाजामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी गांधी विचारांचाप्रभावीउपयोग करून घेतला.सन १९५१ मध्ये ङ्गबापू धर्म सभाफ(बापू धर्म सभा आदिवासी सेवा मंडळ) ची स्थापना केली. या सभेची मुख्य १४ तत्त्व होती. त्यामध्ये खर्या धर्माचे अनुकरण करा,देवावर प्रेम करा, खादीचा प्रचार व वापर करा, चरखा चालवा, महू विकू नका आणि दारू ही जगाची घाण आहे इत्यादि प्रमुख तत्वांचा समावेश होता.विशेषतः दारू बंदी हेप्रमुख तत्व होते. दारू बंदी करण्यासाठीत्यांनी गांधी विचारांचा विशेष उपयोग करून घेतला. आदिवासी समाजामध्ये दारू पिणे सामाज मान्य असले तरी दारूमुळे शरीरावर होणाऱ्या परिणामांच्या बाबतीत त्या सजग होत्या. आदिवासी समाजामध्ये दारूबंदी संबंधी जाणीव जागृतीला प्राधान्य दिले पाहिजे या संबंधी त्या आग्रही होत्या.[५] या काळात आदिवासी समाजाची आर्थिक परिस्थिति हालाकीची होती, अन्नधान्याची टंचाई होती म्हणून महू पासून दारू तयार करण्याऐवजी त्यापासून इतर पौष्टिक खाद्य पदार्थ बनवण्यासाठी आदिवासी समाजाला प्रेरित केले. हा त्यांचा उपक्रम त्या काळात फारच लोकप्रिय झाला. जवळपास ८०,००० लोक या चळवळीसी जोडले गेले.[६] छत्तीसगड बरोबरच ही चळवळ पुढे उत्तर प्रदेश आणि बिहार मध्येही सुरू झाली. १९६३-६४ मधील अखिल भारतीय दारू बंदी परिषदेमध्ये राजमोहिनी देवी यांनी लाल बहादूर शास्त्री आणि पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या समोर या संबंधी एक प्रभावी भाषण दिले त्यामुळे हा त्यांचा उपक्रम राष्ट्रीय स्तरावर पोहचला.

राजमोहिनी देवी यांनी आचार्य विनोबा भावे आणि गांधीजींना आपले गुरू मानलेले होते,त्यांचे आदर्श पुढे घेवून जाण्याचा प्रयत्न केला.[७] विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचा राजमोहिनी देवी यांनी सक्रिय पाठींबा दिला. विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचा उद्देश समाजात समता, मातृत्व आणि स्वराज्य प्रस्थापित करणे हा होता. या चळवळीचा अनेक प्रांतात प्रभाव पडला. तसाच तो सुरगुजा येथेही त्याचा प्रभाव पडला. या कामाला गती देण्याची जबाबदारी राजमोहिनीदेवींनी घेतली. १९५५ ते १९५९ पर्यंत त्यांनी भूदान चळवळीसाठी मोठी पदयात्रा काढली आणि शेकडो एकर जमीन दान म्हणून मिळवली.[८] विनोबा भावे १५ नोव्हेंबर १९६८ रोजी सुरगुजा येथे आले असता त्यांना राजपूरमधील वड्राफनगर आणि सीतापूरचे दोन ब्लॉक भेट देण्यात आले. विनोबा भावे सरवान गावातही गेले तिथे राजमोहिनी देवी आणि त्यांच्या साथीदारांनी अंबिकापूर, बतौली, मेनपत, धौरपूर, राजपूर, शंकरगड आणि बलरांपूर अशी १०१ गावे भूदान चळवळीसाठी दान केली. १७ फेब्रुवारी १९६९ पर्यंत अदयपूर ही ग्रामदानाखाली आले.[९]

समाजसुधारणा, दारूबंदी आणि भूदान चळवळीबरोबरच राजमोहिनी देवी यांनी आदिवासी समाजमधील स्त्रियांच्या प्रश्नावरही त्यांनी विशेष लक्ष्य दिले. आदिवासी स्त्रियांचे स्वातंत्र्य आणि स्वायत्तता तसेच अंधश्रद्धा निर्मूलन हे प्रमुख प्रश्न त्यांनी हाताळलेले दिसतात. मुलींच्या मर्जीविरोधात लग्न करणे, वधूमूल्य देणे व मुलींच्या शिक्षणाला विरोध यासारख्या प्रथांच्या व प्रश्नाच्या विरोधात त्यांनीप्रबोधन केले. राजमोहिनी देवी ह्या धार्मिक वृतीच्या होत्या. स्वातंत्र्यानंतर आदिवासींना आमिष दाखवून ख्रिश्चन बनविण्याचा प्रकार सुरू होता. धर्मांतर रोखण्यासाठी राजमोहिनी देवी यांनीही एक महत्त्वाचा प्रयत्न केला. त्यांनी आदिवासी समाजात या काळात सुरू असलेल्या ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या धार्मिक अतिक्रमण व धर्मांतराला प्रखर विरोध केला.[१०] यासाठी त्यांनी प्रभात फेऱ्या, पदयात्रा व विविध भागात जाणीव जागृती दौरे केले. राजमोहिनी देवी यांची धार्मिक प्रखरता त्यांनी स्थापन केलेल्या बापू धर्म सभेच्या माध्यमातून पुरस्कारस्वरूप जी रक्कम प्राप्त झाली त्या रक्कम समाजकार्यासाठी देत या रक्कमेतून त्यांनी दोन मंदिरांची निर्मिती केली. राजमोहिनी देवी स्वतः धार्मिक वृतीच्या असल्या तरी त्यांनी धर्माचा उपयोग नेहमी सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी केलेला दिसतो.

राजमोहिनी देवी शिक्षित नव्हत्या, मात्र त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण प्रसारासाठी वाहून घेतले. बापू धर्मसभेच्या माध्यमातून गोविंदपूरमध्ये शाळा सुरू केली. राजमोहिनी देवी (माताजी) ग्राम अन्नकोशाची स्थापना दुष्काळ, उपासमार आणि उपासमार यांसारख्या आपत्तींना तोंड देण्यासाठी करण्यात आली. राजमोहिनी देवी यांना त्यांच्या आदिवासी समाजकार्यासाठी

समर्पित केलेल्या कार्यासाठी १९ नोव्हेंबर १९८६ रोजी त्यांना 'इंदिरा गांधी राष्ट्रीय समाज सेवा पुरस्कार' देऊन सन्मानित केले. राजमोहिनी देवी यांनी संपूर्ण आयुष्य आदिवासी समाजमधील समाजसुधारणा व शैक्षणिक कार्यासाठी व्यथित केले. या त्यांच्या कार्याची दखल अखिल भारतीय स्थरावर घेतली गेली. त्यांच्या विशेष कार्याबद्दल त्यांनाभारत सरकारने तत्कालीन राष्ट्रपती आर. वेंकटरमन यांच्या हस्ते२५ मे १९८९ रोजी 'पद्मश्री पुरस्कार' देवून सन्मानित केले.[११]

राजमोहिनी देवी या महान व्यक्तिमत्त्वाचे ६ जानेवारी १९९४ रोजी निधन झाले. राजमोहिनी देवी यांनी देशासाठी केलेले विधायक कार्य देश आणि समाजाला दिशा देणारे आहे. सुरगुजा येथील आदिवासी जनसामुदायासाठी केलेल्या सामाजिक कार्याचे स्मरण राहावे यासाठी छत्तीसगड सरकारने अंबिकापुर येतील शासकीय कन्या महाविद्यालयचे नाव राजमोहिनी देवी गव्हर्नमेंट गर्ल्स पोस्ट ग्रॅज्युएट कॉलेज, अंबिकापूर असे नामकरण केलेले आहे. राजमोहिनी देवी यांनी सुरगुजा आणि परिसरात व्यसनमुक्तीसाठी सत्याग्रह,पदयात्रा काढल्या, विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीला मोठा हातभार लावला. गोहत्या बंदी, ग्रामदान, भूदान आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ सुरू केली. समर्पित सेवाभावनेच्या इतिहासात राजमोहिनी देवी यांनी आपल्या नि: स्वार्थ एक गौरवशाली अध्याय जोडण्याचे कार्य केलेले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१) जिंदाल, सी. सु., सामाजिक क्रांति के अग्रदूत राजमोहिनी देवी, छत्तीसगड राज्य हिंदी ग्रंथ अकादमी, रायपूर, २०१३, पृ. १०

२) कित्ता, पृ. ११

३) मंदिलवार, सचिन, स्वातंत्र्योत्तर छत्तीसगड, सरकारी विश्वनाथ यादव तामसकर पदव्युत्तर स्वायत्त महाविद्यालय, दुर्ग (छत्तीसगड), २००४, पृ. ६८

४) Shrivastav, A. R.N., Tribal Freedom Fighters of India, Publication Division Ministry of Information and Broadcasting, new Delhi, 2017

५) Mukherji, B. M., and MollickFarhad, Trabal People of Central India Problem and Prospects, K. K. Publications, New Delhi, 2022, P. 124-125, भूषण, केयर, छत्तीसगड के नारी राम, जनचेतना प्रकाशन, रायपूर, २००५, पृ. ५३

६) https://amritmahotsav.nic.in/blogdetail.htm?47

७) सिंग, चंद्रप्रताप, प्रगती सुरगुजा, सिद्धार्थ प्रकाशन, अंबिकापूर, २००३, पृ.९८

८) जिंदाल, उपरोक्त,पृ.५६

९) कित्ता,पृ. ५७

१०) Mukherji, B. M., and MollickFarhad, Trabal People of Central India Problem and Prospects, K. K. Publications, New Delhi, 2022, P. 124-125,Dash, K. N., Invitation to Social and Cultural Anthropology, Atlantic Publishers Distributers, New Delhi, 2004, p. 369

११) https://chhattisgarhgatha.com/2023/05/06/67-years-ago-the-movement-for-liquor-ban-started-the-government-bowed-down-before-the-stubbornness-of-a-woman/ छत्तीसगढ गाथा, ६ मे २०२३


■■■